# Child Care & Protection: A Role Of Citizen

तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयातर्फे मुलांची काळजी आणि संरक्षण: नागरिकांची भूमिका या विषयावर राष्ट्रीय वेबिनार संपन्न...

नागपूर: 'बालक ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे' असे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणत. या राष्ट्रीय संपत्तीचे जतन करणे आज आवश्यक आहे. कारण दिवसेंदिवस बालक आणि त्याची सुरक्षा याबद्दल अनेक समस्या,प्रश्न निर्माण होत आहेत. यासाठीच तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर तर्फे 'मुलांची काळजी आणि संरक्षण: नागरिकांची भूमिका' या विषयावर राष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन वेबिनारचे झूम अँप्स द्वारे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिनारला अध्यक्ष म्हणून तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्वाती धर्माधिकारी मॅडम उपस्थित होत्या. लहान बालकांवरील लैंगिक अत्याचारावर आळा घालण्यासाठी पोस्को सारखे कायदे आहेत. ते समजून घेतले पाहिजे असे मत अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

वेबिनारला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ऍड.संजय सेंगर सर (बाल न्याय मंडळ, अकोला) होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले. सेंगर यांनी बालकांच्या कल्याणासाठी संविधानात कोणत्या तरतुदी आणि कायदे आहेत याबद्दल माहिती दिली. पुढे बोलतांना सेंगर यांनी समाजात वावरताना नाकरिकांनी बालकांची आपण कशी काळजी घेऊ शकतो आणि आपली जबाबदारी काय आहे यावर विस्तृत माहिती दिली.

या वेबिनारचे प्रास्ताविक डॉ. शिल्पा पुराणिक मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन स्वर्णिमा कमलवार, दिपांकर भोजने यांनी केले. वेबिनारला उपस्थित अतिथीचे आणि उपस्थितांचे आभार श्रुतिका अंजणकर यांनी मानले. वेबिनारला तुषार हुकरे, वृषाली केकरे, श्रुतिका अंजणकर, सुरज दहागावकर, रोहिणी पवार, मुकुल पराते आणि इतर विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले...